नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २४५ Issue - 245 | वार शनिवार दि. २४ जानेवारी २०२६ Blow- Saturday Date 24 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्येही 'स्वीकृत सदस्य'?

## युतीबाबत स्थानिक नेत्यांना अधिकार; एमआयएम'सोबत समझोता नाही : मंत्री बावनकुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महानगरपालिका आणि नगरपालिकांप्रमाणेच आता जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमध्येही 'स्वीकृत सदस्य' नियुक्त करण्यात यावेत, असा प्रस्ताव महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रस्तावावर सकारात्मकता दर्शविली असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली.

बावनकुळे म्हणाले, ग्रामीण भागात अनेक लोकप्रतिनिधी आणि तज्ज्ञ व्यक्ती विविध सामाजिक क्षेत्रांत उत्तम काम करतात. मात्र, जिल्हा परिषद निवडणुकीत महिला आरक्षण किंवा एससी, एसटी आरक्षणामुळे अनेक अनुभवी आणि अभ्यासू व्यक्तींना निवडणूक लढवता येत नाही. अशा परिस्थितीत, या तज्ज्ञ लोकांच्या अनुभवाचा फायदा ग्रामीण विकासासाठी व्हावा, या हेतूने त्यांना 'स्वीकृत सदस्य' म्हणून संधी दिली जावी, अशी आग्रही मागणी आहे. महसूलमंत्र्यांनी केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि ग्रामविकास मंत्र्यांचीही याबाबत चर्चा करण्यात आली असून हा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणि



त्यानंतर विधिमंडळात मंजुरीसाठी येईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान,राज्यातील महापौर आरक्षणाच्या सोडती अत्यंत पारदर्शकपणे आणि कॅम 'ऱ्यांच्या देखरेखीत झाल्या आहेत. अशा परिस्थितीत विजय वडेट्टीवार यांनी या प्रक्रियेवर आक्षेप घेणे किंवा कलंक लावणे हे त्यांना शोभणारे नाही, असे ते म्हणाले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत धाराशिव, लातूर, परभणी आणि संभाजीनगरमधील काही भागांत भाजप-शिवसेना युती झाली असून, काही ठिकाणी जागावाटपाची चर्चा सुरू आहे. गेल्या १० वर्षांत निवडणुका न झाल्यामुळे अनेक ठिकाणी स्थानिक कार्यकर्ते निवडणूक लढवण्यासाठी आग्रही आहेत. ज्या ठिकाणी शक्य आहे, तिथे युती करण्याचा भाजपचा प्रामाणिक प्रयत्न असून, काही ठिकाणी स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेतले जातील.

अचलपूर नगरपालिकेच्या सत्तास्थापनेवरून सुरू असलेल्या चर्चांवर महसूलमंत्र्यांनी कडक भूमिका मांडली. अचलपूरमध्ये भाजपचे ९ नगरसेवक असून आम्ही तिथे अल्पमतात आहोत. तिथे एमआयएम, काँग्रेस आणि उबाठा गटाने आपले स्वतंत्र गट तयार केले आहेत. भाजप एमआयएमला कधीही सोबत घेणार नाही आणि आमचा त्यांना कोणताही पाठिंबा नाही, असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले.



बदलापुरातील अत्याचाराच्या घटनेवर त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. ते म्हणाले , बदलापूरात घडलेली घटना अतिशय गंभीर आणि दुर्दैवी आहे. गुन्हेगारांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही.

प्रकाश आंबेडकर यांच्या विधानाचा समाचार घेताना बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्र्यांबद्दल अशा खालच्या पातळीवर जाऊन वक्तव्य करणे खेदजनक आहे. देवेंद्र फडणवीस यांचे कर्तृत्व मोठे असून त्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. अशा वेळी विरोधी पक्षांनी टीका करण्याऐवजी त्यांचे जाहीर आभार मानायला हवेत. विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी सर्वांनी आपली वैचारिक पातळी सुधारण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

# तीन सहकारी बँकांना आर्थिक दंड, महाराष्ट्रातील दोन बँकांचा समावेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून देशातील बँका, वित्तीय संस्था, फायनान्स कंपन्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवलं जातं. एखाद्या संस्थेकडून नियमांचं उल्लंघन झाल्यास आरबीआयकडून विविध प्रकारची कारवाई केली जाते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया नियमांचं उल्लंघन झाल्यास आर्थिक स्वरुपाचा दंड बँका आणि इतर वित्तीय संस्थांना करते. आरबीआयनं २२ जानेवारीला प्रसिद्ध केलेल्या प्रसिद्धीपत्रकांनुसार तीन सहकारी बँकांना आर्थिक दंड करण्यात आला आहे. यामध्ये दोन सहकारी बँका महाराष्ट्रातील आहेत.



**रिझर्व्ह बँकेचा मोठा निर्णय**

आरबीआयकडून पिंपरी चिंचवड सहकारी बँक मर्यादित, पिंपरी आणि श्री कन्याका नागरी सहकारी बँक,लिमिटेड चंद्रपूर या दोन बँकांवर आर्थिक दंड लादण्यात आला आहे. याशिवाय मध्य प्रदेशातील श्री सत्य साई नगारिक सहकारी बँक मर्यादित, भोपाळ या बँकेला देखील आर्थिक दंड लादण्यात आला आहे. व्हीएसजे इन्वेस्टमेंटस प्रायव्हेट लिमिटेड मुंबई यांना देखील आर्थिक दंड करण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड सहकारी बँक मर्यादित पिंपरी या बँकेला २० जानेवारी २०२६ च्या आदेशानं २.१० लाख रुपयांचा दंड करण्यात आला आहे. या बँकेनं आरबीआयच्या एक्स्पोजर नॉर्म्स अँड स्टॅट्युटरी / अदर रिस्ट्रिक्शन्सची पूर्तता न केल्यानं हा दंड लादण्यात आला आहे. आरबीआयनं ३१ मार्च २०२५ च्या आर्थिक स्थितीचं परिक्षण केलं. यामध्ये आढळलेल्या बाबींबाबत बँकेला कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली होती. त्यानंतर बँकेनं दिलेल्या उत्तराची दखल घेतल्यानंतर आरबीआयला आढळलेल्या त्रुटी कायम राहिल्या. बँकेने असुरक्षित कर्जांबाबतची निर्धारित मर्यादा ओलांडली होती, असा निष्कर्ष काढण्यात आला.

चंद्रपूर येथील श्री कन्याका नागरी सहकारी बँक लिमिटेड या बँकेला आरबीआयनं ८ लाखांचा दंड केला आहे. या बँकेनं बिल्डर्स आणि कंत्राटदारांना कर्ज देण्यासंदर्भात नियमांची पूर्तता न केल्याचं समोर आल्यानं दंड लादण्यात आला आहे. आरबीआयच्या निष्कर्षानुसार या बँकेनं बिल्डर्स आणि कंत्राटदारांना दिलेल्या कर्जातील काही रक्कम जमीन ताब्यात घेण्यासाठी वापरण्यात आले. आरबीआयनं मध्यप्रदेशातील श्री सत्य साई नागरिक सहकारी बँक मर्यादित, भोपाळ या बँकेला १ लाख रुपयांचा दंड केला आहे. या बँकेनं प्रुडेन्शिअल इंटर बँक ग्रॉस एक्स्पोजर लिमिट आणि काऊंटरपार्टी एक्स्पोजर लिमिटचं उल्लंघन केल्याचं आरबीआयनं म्हटलं आहे. दरम्यान, व्हीएसजे इन्वेस्टमेंटस प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई या कंपनीला आरबीआयनं ८० हजार रुपयांचा दंड केला आहे. या कंपनीनं अपात्र संस्थेकडून कर्ज घेतल्याचं समोर आलं आहे.

केरळमधील द इरिंजलकुडा टाउन को-ऑपरेटिव्ह बँकेला आरबीआयच्या आदेशानुसार यापूर्वी २९ जुलै २०२५ पासून सहा महिने कामकाज बंद ठेवण्यास सांगण्यात आलं होतं. तो कालावधी ३० जानेवारीपासून पुढील सहा महिने वाढवण्यात आला आहे.

# महाराष्ट्र सदन घोटाळ्यात एसीबीनंतर आता ईडीच्या केसमध्येही छगन भुजबळ सहीसलामत सुटले; निर्दोष मुक्ततेचा अर्ज कोर्टाकडून मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांची महाराष्ट्र सदन घोटाळ्यात एसीबीनंतर आता ईडीच्या केसमध्येही भुजबळांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. सक्तवसुली संचालनालय (एऊ) भुजबळ यांच्याविरुद्ध मनी लॉन्ड्रिंगच्या प्रकरणाचा तपास करत होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी कोणतीही निविदा न मागवता 'के.एस. चामणकर एंटरप्राइजेस'ला (घ ड उहरारपज्ञरी एपींशीाळिशी) कंत्राट दिले असा आरोप करण्यात आला होता. छगन भुजबळ आणि इतरांनी निर्दोष मुक्ततेसाठी केलेला अर्ज कोर्टाने मंजूर केला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (उइ) असा दावा केला होता की, सरकारी कर्मचाऱ्यांनी अहवालात चुकीची माहिती दिली आणि बनावट ताळेबंद तयार केला. विकासकाला १.३३ टक्के नफा होणार असल्याचे दाखवण्यात आले, मात्र प्रत्यक्षात तो ३६५.३६ टक्के होता, असा एसीबीचा आरोप होता.

सप्टेंबर २०२१ मध्ये विशेष न्यायालयाने छगन भुजबळ यांना या प्रकरणातून दोषमुक्त केले होते. न्यायालयाने स्पष्ट केले की, विकासकाने भुजबळ किंवा त्यांच्या कुटुंबाला १३.५ कोटी रुपये दिल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. तसेच एसीबीने केलेला नफा-तोट्याचा हिशोब अयोग्य आणि बेकायदेशीर असल्याचे न्यायालयाने नमूद केले होते. कंत्राटाचा अहवाल तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, परिवहन मंत्री आणि सात वरिष्ठ नोकरशहांच्या समितीसमोर गेला होता. त्यामुळे केवळ चुकीची माहिती देऊन या सर्वांची दिशाभूल केली गेली, हे मान्य करणे कठीण असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले होते.

महाराष्ट्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २०१५ मध्ये छगन भुजबळ यांच्या मुंबई, ठाणे आणि नाशिक येथील १७ मालमत्तांवर छापे टाकले होते. पदाचा गैरवापर आणि फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. मुंबईतील ७, ठाणे-पुण्यात प्रत्येकी २ आणि नाशिकमधील ५ मालमत्तांवर एसीबीच्या १५ पथकांनी छापे टाकले होते.

दुसरीकडे, नवी मुंबईतील 'हेक्सवर्ल्ड' नावाच्या गृहनिर्माण प्रकल्पात सदनिका खरेदीदारांची फसवणूक केल्याचा आरोप छगन भुजबळ यांचे चिरंजीव पंकज आणि पुतण्या समीर यांच्यावर होता. २३४४ फ्लॅट्स विकून ४४ कोटी रुपये गोळा केले गेले, परंतु प्रकल्प पूर्ण झाला नाही, असे सांगण्यात आले होते. सप्टेंबर २०२१ मध्ये विशेष न्यायालयाने पंकज आणि समीर भुजबळ यांना या फसवणुकीच्या प्रकरणातून दोषमुक्त केले होते.

# चकमक; कठुआमध्ये जैशचा दहशतवादी ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कठुआ : जम्मू आणि काश्मीरमधील कठुआ येथे सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत जैशचा एक दहशतवादी ठार झाला. जम्मूचे आयजीपी यांच्या मते, बिल्लावार परिसरात ही चकमक झाली. मिळालेल्या माहितीनुसार, काही दहशतवादी बिल्लावारच्या घनदाट जंगलात लपले होते.

माहिती मिळाल्यानंतर, जम्मू आणि काश्मीर पोलिस आणि सीआरपीएफने संयुक्तपणे सापळा रचला आणि जंगलाला वेढा घातला, ज्यामुळे दहशतवाद्यांचे पळून जाण्याचे मार्ग रोखले गेले.

जम्मू रेंजचे पोलिस महानिरीक्षक भीम सेन तुती यांनी सांगितले की, बिल्लावार परिसरात संयुक्त कारवाईदरम्यान दहशतवादी ठार झाला. जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी लष्कर आणि केंद्रीय राखीव पोलिस दल (सीआरपीएफ) सोबत संयुक्त कारवाईत बिल्लावारमध्ये एका पाकिस्तानी जैश दहशतवाद्याला निष्क्रिय केले, असे जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. अधिकाऱ्यांनी ठार झालेल्या दहशतवाद्याची ओळख जैश-ए-मोहम्मदचा कमांडर उस्मान म्हणून केली आहे आणि त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे, ज्यामध्ये एम४ ऑटोमॅटिक रायफलचा समावेश आहे. माहितीनुसार, फेब्रुवारी २०२४ मध्ये, उस्मानसह १० दहशतवाद्यांच्या गटाने जम्मूमध्ये घुसखोरी केली. या गटात फरमान, पाशा, आदिल आणि सैफुल्लाह नावाचे दहशतवादी होते. सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमकीची बातमी आधीच आली होती. ऑपरेशन दरम्यान, जेव्हा सैनिक आणि दहशतवादी समोरासमोर आले तेव्हा जोरदार गोळीबार सुरू झाला होता.

## आगामी निवडणुका केरळची दशा-दिशा बदलतील

## पीएम स्वनिधी क्रेडिट कार्ड योजनेचा शुभारंभ

# विकसित भारताच्या उभारणीसाठी संपूर्ण देश एकजूट : पंतप्रधान नरेंद्र मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तिरुवनंतपुरम : विकसित भारत घडवण्यासाठी आज संपूर्ण देश एकजुटीने प्रयत्न करत आहे, असे विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी तिरुवनंतपुरम येथे केले.निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तिरुवनंतपुरम येथे पंतप्रधान मोदींनी पानूर ओव्हरब्रिजपासून पुथरिकंडम मैदानापर्यंत एक भव्य रोड शो केला. या दरम्यान त्यांनी विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन केले. काही प्रकल्पांची पायाभरणी केली तसेच काही प्रकल्पांना हिरवा झेंडा दाखवला. यासोबतच त्यांनी पीएम स्वनिधी क्रेडिट कार्ड योजनेचेही शुभारंभ केला आणि एक लाख लाभार्थ्यांना पीएम स्वनिधी अंतर्गत कर्जांचे वितरण केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की,विकसित भारत घडवण्यासाठी आज संपूर्ण देश एकजुटीने प्रयत्न करत आहे. विकसित भारताच्या निर्मितीत शहरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. गेल्या ११ वर्षांपासून केंद्र सरकारने शहरी मूलभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली असल्याचेही त्यांनी सांगितले. पंतप्रधानांनी स्पष्ट केले की केंद्र सरकार शहरांतील गरीब कुटुंबांसाठी मोठ्या प्रमाणावर काम करत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत देशभरात चार कोटींहून अधिक घरे बांधून ती गरीबांना देण्यात आली आहेत. यामध्ये शहरी गरीबांसाठी एक कोटींपेक्षा जास्त घरे उभारण्यात आली असून केरळमधील सव्वा लाख शहरी गरीब कुटुंबांना स्वतःचे पक्के घर मिळाले आहे. ते पुढे म्हणाले की गरीब कुटुंबांचा वीजखर्च कमी व्हावा यासाठी पीएम सूर्य घर मोफत



वीज योजना सुरू करण्यात आली आहे. गरीबांना आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य उपचार मिळत आहेत. महिलांच्या आरोग्य सुरक्षेसाठी मातृ वंदना योजना राबवली जात आहे. केंद्र सरकारने १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केल्यामुळे केरळसह देशभरातील मध्यमवर्गीय आणि नोकरदारांना मोठा लाभ झाला आहे.

पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की गेल्या ११ वर्षांत कोट्यवधी नागरिकांना बँकिंग व्यवस्थेशी जोडण्याचे मोठे काम करण्यात आले आहे. आता गरीब एससी, एसटी, ओबीसी, महिला तसेच मच्छीमारांनाही सहजपणे बँक कर्ज मिळत आहे. त्यांच्याकडे हमीदार नसला तरी सरकार स्वतः त्यांची हमीदार बनत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.पंतप्रधान म्हणाले की रस्त्याच्या कडेला, गल्लीबोळांत माल विकणाऱ्या रेहडी-पटरीवाल्यांची परिस्थिती पूर्वी अत्यंत बिकट होती. त्यांच्या सक्षमीकरणासाठी पीएम स्वनिधी योजना सुरू करण्यात आली. या योजनेमुळे देशभरातील लाखो रेहडी-पटरीवाल्यांना बँकांकडून मोठी मदत मिळाली असून अनेकांना आयुष्यात पहिल्यांदाच बँकेकडून कर्ज मिळाले आहे. आता केंद्र सरकार एक पाऊल पुढे टाकत या लाभार्थ्यांना क्रेडिट कार्ड देत आहे. काही वेळापूर्वी तिरुवनंतपुरम येथेही पीएम स्वनिधी क्रेडिट कार्डचे वितरण करण्यात आले. यामध्ये केरळमधील १० हजार आणि तिरुवनंतपुरममधील ६०० लाभार्थी आहेत. पूर्वी क्रेडिट कार्ड फक्त श्रीमंतांकडे असायचे, पण आता रेहडी-पटरीवाल्यांकडेही क्रेडिट कार्ड असल्याचे चित्र दिसत असल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले.

सीपीएमच्या नेतृत्वाखालील एलडीएफ आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ ही केरळमधील दोन प्रमुख आघाड्या असून, भाजप आता तळागाळात तिसरा प्रभावी पर्याय म्हणून पुढे येत असल्याचे त्यांनी नमूद केले.ते पुढे म्हणाले, एलडीएफ आणि यूडीएफचे झेंडे वेगळे असले तरी त्यांचा अजेंडा एकच आहे - संपूर्ण भ्रष्टाचार आणि शून्य जबाबदारी. पूर्ण सांप्रदायिकता आणि कोणतीही उत्तरदायित्वाची भावना नाही. त्यांना माहिती आहे की पाच-दहा वर्षांनी पुन्हा सत्ता मिळेल. सरकार बदलते, पण व्यवस्था बदलत नाही. आता लोकांच्या हितासाठी आणि विकासाला प्राधान्य देणाऱ्या सरकारची गरज आहे. भाजप आणि एनडीए हे करून दाखवतील.

## संपादकीय....

# रिझर्व्ह बँकेचा अंकुश

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून देशातील बँका, वित्तीय संस्था, फायनान्स कंपन्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवलं जातं. एखाद्या संस्थेकडून नियमांचं उल्लंघन झाल्यास आरबीआयकडून विविध प्रकारची कारवाई केली जाते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया नियमांचं उल्लंघन झाल्यास आर्थिक स्वरुपाचा दंड बँका आणि इतर वित्तीय संस्थांना करते. आरबीआयनं २२ जानेवारीला प्रसिद्ध केलेल्या प्रसिद्धीपत्रकांनुसार तीन सहकारी बँकांना आर्थिक दंड करण्यात आला आहे. यामध्ये दोन सहकारी बँका महाराष्ट्रातील आहेत. आरबीआयकडून पिंपरी चिंचवड सहकारी बँक मर्यादित, पिंपरी आणि श्री कन्याका नागरी सहकारी बँक,लिमिटेड चंद्रपूर या दोन बँकांवर आर्थिक दंड लादण्यात आला आहे. याशिवाय मध्य प्रदेशातील श्री सत्य साई नगारिक सहकारी बँक मर्यादित, भोपाळ या बँकेला देखील आर्थिक दंड लादण्यात आला आहे. व्हीएसजे इन्वेस्टमेंटस प्रायव्हेट लिमिटेड मुंबई यांना देखील आर्थिक दंड करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड सहकारी बँक मर्यादित पिंपरी या बँकेला २० जानेवारी २०२६ च्या आदेशानं २.१० लाख रुपयांचा दंड करण्यात आला आहे. या बँकेनं आरबीआयच्या एक्स्पोजर नॉर्म्स अँड स्टॅट्युटरी / अदर रिस्ट्रिक्शन्सची पूर्तता न केल्यानं हा दंड लादण्यात आला आहे. आरबीआयनं ३१ मार्च २०२५ च्या आर्थिक स्थितीचं परिक्षण केलं. यामध्ये आढळलेल्या बाबींबाबत बँकेला कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली होती. त्यानंतर बँकेनं दिलेल्या उत्तराची दखल घेतल्यानंतर आरबीआयला आढळलेल्या त्रुटी कायम राहिल्या. बँकेने असुरक्षित कर्जांबाबतची निर्धारित मर्यादा ओलांडली होती, असा निष्कर्ष काढण्यात आला. चंद्रपूर येथील श्री कन्याका नागरी सहकारी बँक लिमिटेड या बँकेला आरबीआयनं ८ लाखांचा दंड केला आहे. या बँकेनं बिल्डर्स आणि कंत्राटदारांना कर्ज देण्यासंदर्भात नियमांची पूर्तता न केल्याचं समोर आल्यानं दंड लादण्यात आला आहे. आरबीआयच्या निष्कर्षानुसार या बँकेनं बिल्डर्स आणि कंत्राटदारांना दिलेल्या कर्जातील काही रक्कम जमीन ताब्यात घेण्यासाठी वापरण्यात आले. आरबीआयनं मध्यप्रदेशातील श्री सत्य साई नागरिक सहकारी बँक मर्यादित, भोपाळ या बँकेला १ लाख रुपयांचा दंड केला आहे. या बँकेनं प्रुडेन्शिअल इंटर बँक ग्रॉस एक्स्पोजर लिमिट आणि काऊंटरपार्टी एक्स्पोजर लिमिटचं उल्लंघन केल्याचं आरबीआयनं म्हटलं आहे.

# व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षणात सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी एमएसडीईने जागतिक आर्थिक मंचासोबत केला ऐतिहासिक सामंजस्य करार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : कौशल्य विकास, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षणात बहुपक्षीय सहकार्य अधिक दृढ करण्याच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल म्हणून, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाने (एमएसडीई) भारताची कौशल्ये आणि तांत्रिक तसेच व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण परिसंस्था मजबूत करण्याबाबत सहकार्य करण्यासाठी 'डब्ल्यूईएफ' म्हणजेच जागतिक आर्थिक मंचाबरोबर सामंजस्य करार केला आहे.

या सामंजस्य कराराद्वारे, एमएसडीई जागतिक आर्थिक मंचासोबत सहकार्य करून भारतात एक 'स्किल्स ॲक्सीलेटर' सुरू करून त्याची अंमलबजावणी करेल, जो एक बहु-हितधारक मंच आहे. या केंद्राचा उद्देश मनुष्यबळातील महत्त्वाच्या कौशल्यांमधील त्रुटी दूर करण्यासाठी अभिनव उपाय आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारीचा शोध घेणे आणि त्याला गती देणे हा आहे.

याबाबत, कौशल्य विकास आणि उद्योजकता आणि शिक्षण राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) जयंत चौधरी म्हणाले, ''भारताच्या कौशल्य परिसंस्थेला काम ाच्या भविष्याशी संरेखित करण्यासाठी एक धोरणात्मक दृष्टीकोन म्हणून ज्याची सुरुवात झाली होती ते आता संरचित आणि जागतिक वित्तपुरवठा आणि आजीवन शिक्षणाला प्रोत्स-ाहन देऊन जागतिक श्रम बाजारपेठेच्या मागणीशी संरेखित केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि व्हिजन इंडिया ˘२०४७ शी संरेखित हा दृष्टिकोन समावेशक विकास आणि राष्ट्रीय परिवर्तनाचा एक मध्यवर्ती स्तंभ म्हणून कौशल्याला बळकटी देतो.''

या घोषणेबाबत बोलताना शिक्षण राज्यमंत्री सुकांता मजुमदार म्हणाले, ''भारतात स्किल्स ॲक्सिलरेटर सुरू करण्यासाठी कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय आणि जागतिक आर्थिक मंच यांच्यातील ऐतिहासिक सामंजस्य कराराचे मी मनापासून स्वागत करतो. स्किल्स ॲक्सिलरेटर भारताच्या व्हिजन ˘२०४७ आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० च्या अनुषंगाने आजीवन शिक्षण, कौशल्य विकास आणि कौशल्य वृद्धीला प्रोत्साहन देऊन कौशल्यांमधील त्रुटी धोरणात्मकरित्या दूर करण्यावर लक्ष केंद्रित करेल.

या सहकार्याचा भाग म्हणून, वेगवान कौशल्यविकासासाठी नव-ोन्मेषी वित्तपुरवठा यंत्रणांना पाठबळ मिळेल, प्रमुख भागधारकांमधील धोरणात्मक समन्वय सक्षम होईल. तसेच विविध व्यवसाय आणि रोजगार क्षेत्रांमधील उदयोन्मुख जागतिक मागणी व पुरवठ्याच्या स्थिती ओळखून आंतरराष्ट्रीय रोजगारक्षमता वाढविण्यास मदत होईल. कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, हरित ऊर्जा, सायबर सुरक्षा आणि प्रगत वस्तुनिर्माण यांसारख्या 'भविष्यातील कामकाज' क्षेत्रांतील उदयोन्मुख विभागांमध्ये सहकार्यावर विशेष भर देण्यात येईल. यासोबतच हॅकाथॉनसारख्या नवोन्मेषाधारित उपक्रम ांसह संरचित कृती आराखड्याची अंम लबजावणीही करण्यात येणार आहे.

हा करार आंतरमंत्रालयीन सक्षम समन्वयाचे प्रतीक आहे. कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि शिक्षण मंत्रालय हे जागतिक भागीदारीमार्फत भारताच्या कौशल्य विकास आणि व्यावसायिक शिक्षणाच्या कार्ययोजना पुढे नेण्यासाठी एकत्र काम करत आहेत.

हे सहकार्य भारत आणि जागतिक आर्थिक मंच यांच्या संबंधांतील नवीन अध्याय आहे. हे सहकार्य स्वित्झर्लंडम धील दावोस-क्लोस्टर्स इथं जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या ५५ व्या जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीत भारताच्या सहभागादरम्यान निर्माण झालेल्या गतीवर आधारित आहे. या बैठकीत कौशल्य विकासाला समावे-शी वाढ आणि जागतिक सहकार्याचा महत्त्वाचा स्तंभ म्हणून अधोरेखित करण्यात आले होते. जागतिक आर्थिक मंचासोबतच्या या भागीदारीद्वारे कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय सुधारणा वेगाने पुढे नेण्याचे, जागतिक संबंध दृढ करण्याचे आणि भारताला कौशल्य, प्रतिभा आणि नवोन्मेषासाठी आघाडीचे केंद्र बनवण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे. यामुळे पुढील दशकांसाठी लवचिक, समावेशी आणि भविष्यासाठी सक्षम कार्यदल तयार होईल.

# श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचा विवाह सोहळा : सुमारे ७ हजार भाविकांनी घेतला अन्न प्रसादाचा लाभ

**कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते पाद्यपूजा संपन्न; प्रदक्षिणा मार्गाने भव्यदिव्य शोभायात्रा**


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : वसंत पंचम ीच्या शुभ मुहूर्तावर आज गुरुवार, दिनांक २३ जानेवारी रोजी श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेचा विवाह सो-हळा मोठ्या भक्तिभावात व उत्साहपूर्ण वातावरणात श्री विठ्ठल सभामंडप येथे संपन्न झाला.

दुपारी ठीक ४.३० वाजता श्री विठ्ठल रूक्मिणी मातेची पाद्यपूजा मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र शेळके यांच्या शुभहस्ते सपत्नीक विधीवत पार पडली. या सोहळ्यासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावली होती.

विवाह सोहळ्यानिमित्त दर्शनासाठी व सहभागी होण्यासाठी आलेल्या भाविकांसाठी श्री संत तुकाराम भवन व श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे अन्नप्रसादाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. या अन्नप्रसादाचा सुमारे ७,००० भाविकांनी लाभ घेतला.

अन्नप्रसादामध्ये चपाती, भरले वांगे, मटकी-बटाटा-वटाणा रस्सा भाजी, दही चटणी, पापड, भजी, जिरा राईस, फोडणीचे वरण, गुलाबजाम, शिरा, बालुशाही, जिलेबी तसेच बुंदी लाडू यांचा समावेश होता. सदर भोजनप्रसाद व्यवस्थेची जबाबदारी विभाग प्रमुख श्री. विनोद पाटील व श्री. बलभिम पावले यांच्याकडे सोपविण्यात आली होती. अन्नप्रसाद वाटपासाठी विविध स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवक सहकार्य करत होते. यावेळी विवाह सोहळ्यानिमित्त प्रदक्षिणा मार्गाने भव्य व देखणी शोभायात्रा काढण्यात



आली. शोभायात्रेमध्ये ढोलपथक, मर्दानी खेळ, लेझीम पथक, लाईट छत्री, बॅन्ड पथक यांचा समावेश होता. आकर्षक फ ुलांनी सजविण्यात आलेल्या रथामुळे शोभायात्रेला विशेष शोभा प्राप्त झाली. या शोभायात्रेचा आनंद घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.



# कॉपी प्रकार आढळलेले दहावी-बारावीचे १०७ परीक्षा केंद्र रद्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : फेब्रुवारी महिन्यात इयत्ता दहावी आणि बारावीची परीक्षा होणार आहे. या परीक्षेसाठी दरवर्षीप्रमाणं महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. या दक्षता समितीच्या माध्यमातून प्रत्येक केंद्रावर बारीक नजर असेल, अशी माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी दिली.

पुण्यात आज महाराष्ट्र राज्य म ाध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ येथे शिक्षण आयुक्तांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी मंडळाचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी दहावी आणि बारावीच्या परीक्षेच्या नियोजनाबाबत माहिती दिली.

मंडळाचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी म्हणाले, ''दहावी आणि बारावीच्या परीक्षेसाठी दक्षता समि ती तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कार्यकारी अभियंता, प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी असणार आहे''.

जिल्ह्यातील परीक्षा कॉपीमुक्त आणि निकोप वातावरणात पार पडण्याची जबाबदारी दक्षता समि तीची असणार आहे. तसेच परीक्षा सुरू होण्याअगोदर एक दिवस आधी परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा सुव्यवस्थित आहेत का, याची जिल्हा दक्षता समितीमार्फत खात्री करण्यात येईल. जिल्ह्यातील मोठ्या परिरक्षक केंद्रासाठी प्रश्नपत्रिका नेणे आणि उत्तरपत्रिका गोळा करण्यासाठी आवश्यकतेनुसार शासकीय वाहने अधिग्रहीत करून वाहने संबंधित केंद्रांना उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

गैरमार्ग करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात येणार- राज्यातील उपद्रवी आणि संवेदनशील परी-क्षा केंद्र परिसरामध्ये जिल्हा दक्षता समितीमार्फत ड्रोन कॅमेराद्वारे परीक्षा केंद्राची निगराणी करण्यात येणार आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा दक्षता समितीमार्फत व्हिडीओ चित्रिकरणाची व्यवस्था करण्यात येणार आहे. जिल्हयातील सर्व विभागानं शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रावर भरारी पथके आणि बैठी पथके उप-लब्ध होतील याचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक भरारी पथकामध्ये किमान एक महिला प्रतिनिधीचा समावेश करण्यात येणार आहे. कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे आणि प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर दखल-पात्र आणि अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाहीदेखील करण्यात येणार असल्याचं यावेळी डॉ. त्रिगुण कुलकर्णी सांगितलं.

दहावीची ५,१११ केंद्रावर होणार परीक्षा- यंदाच्या वर्षी दहावीच्या परीक्षेसाठी जवळपास १६,१४,९८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. ५,१११ केंद्रावर परीक्षा होणार आहे. तर २० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत दहावीची परीक्षा होणार आहे. तर इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी १,५२,८६२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. तर ३,३८७ केंद्रावर परीक्षा होणार आहे. तर १० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान बारा-वीची परीक्षा होणार असल्याचंदेखील त्यांनी सांगितले.

दहावीची ७६ परीक्षा केंद्र तर बारावीची ३१ परीक्षा केंद्र बंद- मागच्या वर्षी दहावी बारावीच्या परीक्षेमध्ये गैरप्रकार घडलेली परीक्षा केंद्र करण्यात आली आहेत. नऊ विभागात बारावीच्या परीक्षेमध्ये घडलेल्या गैरप्रकार ७६ केंद्र बंद करण्यात आली आहे. यात पुण्यातील १२, नागपूर १०, छत्रपती संभाजीनगर २८, मुंबई ५, अमरावती ७,नाशिक ६, लातूर ८ केंद्र बंद करण्यात आली आहे.तर दहावीच्या परीक्षेत गैरप्रकार घडल्यानं ३१ केंद्र बंद करण्यात आले आहेत. यात पुण्यातील ७, नागपूर ६, संभाजीनगर १०, मुंबई १, लातूर ७ केंद्र बंद करण्यात आली आहेत.

# '२५ वा भारत रंग महोत्सव २०२६' भारतातील ४० ठिकाणी आणि सातही खंडांमधील प्रत्येकी एका देशात अभूतपूर्व भव्य स्वरूपात साजरा होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राष्ट्रीय नाट्य विद्यालय (एनएसडी) च्या वतीने २७ जानेवारी ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत भारत रंग महोत्सव (बीआरएम) २०२६ या जगातील सर्वात भव्य आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सवाच्या २५ व्या आवृत्तीचे आयोजन करण्यात येणार असून यंदाचा हा महोत्सव आजवरचा सर्वात व्यापक आणि समावेशक असणार आहे.

भारत रंग महोत्सव २०२६ हा महत्त्वाचा टप्पा असून त्याअंतर्गत देशभरातील ४० ठिकाणी नाट्यप्रयोग सादर केले जातील, तसेच सात खंडांम धील प्रत्येकी किमान एका देशातील निर्मिती असेल, त्यामुळे महोत्सवाची जागतिक पोहोच आणि सांस्कृतिक क्षेत्रात वाजणारा त्याचा डंका अधिक दृढ होईल.

या महोत्सवात एकूण २७७ भारतीय प्रस्तुती सादर केल्या जा-तील, त्यामध्ये १३६ निवडक नाटके आणि आमंत्रित प्रस्तुती, तसेच १२ आंतरराष्ट्रीय निर्मितींचा समावेश असेल. या निर्मितींमध्ये २२८ भारतीय आणि परदेशी भाषांतील तसेच बोलीभाषांमधील सादरीकरणांचा समावेश आहे, ज्यामुळे भारत रंग म होत्सव भाषिक विविधतेच्या बाबतीत जगातील सर्वात मोठा रंगभूमी म होत्सव ठरला आहे.

महोत्सवात सहभागासाठी आलेल्या ८१७ राष्ट्रीय आणि ३४ आंतरराष्ट्रीय अर्जांच्या कठोर चाचणी प्रक्रियेतून नाटकांची निवड करण्यात आली. याव्यतिरिक्त, महोत्सवात विविध केंद्रांमध्ये १९ विद्यापीठांसह १४ स्थानिक प्रस्तुतींचाही महोत्सवात समावेश आहे.

याप्रसंगी बोलताना, एनएसडीचे उपाध्यक्ष प्रा. भरत गुप्त म्हणाले: ''भारत रंग महोत्सव २०२६ हा केवळ उद्देश म्हणून नव्हे तर एकूणच व्यापक स्वरूपात रंगभूमीच्या लोकशाहीकरण आणि सार्वत्रिकीकरणाचे प्रतीक आहे. हा महोत्सव विविध समुदाय आणि वयोगटाच्या विविध भाषा, शैली आणि नाट्य अभिव्यक्तींचा समावेश करून सामायिक सर्जनशील सातत्य राखण्याच्या भारताच्या नीतिमत्तेचे प्रतिबिंबित करतो.''

या आवृत्तीने मैथिली, भोजपुरी, तुळु, उर्दू, संस्कृत, ताई खामटी, न्यशी यांसह जवळज-वळ सर्व प्रमुख भारतीय भाषा आणि अनेक आदिवासी आणि विलुप्तप्राय भाषांसह सादरीकरणे करून भाषिक आणि सांस्कृतिक पटल लक्षणीयरित्या विस्तारले आहे.

पहिल्यांदाच, लडाख, अंदमान आणि निकोबार बेटे, लक्षद्वीप, दमण आणि दीव, आयझॉल (मिझोरम), तुरा (मेघालय), नागाव (आसाम), मंडी (हिमाचल प्रदेश) आणि रोहतक (हरियाणा) यासह अनेक नवीन केंद्रे जोडण्यात आली आहेत.

या महोत्सवाची भावना अधोरेखित करताना, एनएसडीचे संचालक चित्तरंजन त्रिपाठी म्हणा-ले: ''२५ वा भारत रंग महोत्सव हा लोकांचा , लोकांद्वारे आणि लोकांसाठी रंगभूमीचा महाकुंभ आहे. हा एक सर्वसमावेशक, सामान्यांचा आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सव आहे जिथे भाषा, प्रदेश, सौंदर्यशास्त्र आणि विचारसरणी विविध नाट्यरूपांमधून एकत्र येतात.''

भारत रंग महोत्सव २०२६ म ध्ये आदिरंग महोत्सव (आदिवासी रंगभूमी, नृत्य आणि हस्तकला), जश्ने बचपन (बाल रंगभूमी), बाल संगम (मुलांद्वारे लोकनृत्य आणि नाटक), पूर्वोत्तर नाट्य समारोह (ईशान्य रंगभूमी), कठपुतळी रंगभूमी महोत्सव, नृत्य नाट्य महोत्सव, शास्त्रीय संस्कृत नाट्य महोत्सव आणि लघु नाट्य महोत्सव यासह विविध प्रकारचे नाट्य महोत्सव सादर केले जातील.

प्रथमच, ट्रान्सजेंडर समुदाय, लैंगिक कामगार, ज्येष्ठ नागरिक आणि इतर कमी प्रतिनिधित्व असलेल्या गटांची निर्मिती प्रस्तुत केली जाणार आहे.

या महोत्सवाच्या माध्यमातून भगवान बिरसा मुंडा, लोकमाता अहिल्याबाई होळकर आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांसारख्या थोर ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या स्मृतींना उजाळा दिला जाईल. तसेच रतन थियाम, दया प्रकाश सिन्हा, बन्सी कौल आणि आलोक चॅटर्जी यांसारख्या रंगभूमीवरील दिग्गज कलावंतांना आदरांजली वाहिली जाणार आहे. इब्राहिम अल्काझी यांच्या सन्म ानार्थ नवी दिल्लीतील राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या (एनएसडी) संकुलात एका विशेष चर्चासत्राचे आयोजन केले जाईल. यासोबतच, कर्करोगावर मात केलेल्या आणि राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे माजी विद्यार्थी असलेल्या कलावंताने लिहिलेले तसेच सादर केलेले एक नाट्य सादरीकरणही यावेळी होणार आहे.

लोककलांचे सादरीकरण, पथनाट्य, चर्चासत्रे, मास्टर क्लासेस आणि कार्यशाळा असे उपक्रम या म होत्सवाचा अविभाज्य भाग असतील. राष्ट्रीय नाट्य विद्यालय विद्यार्थी संघटनेच्या नेतृत्वात अद्वितीय या विशेष विभागातंर्गत राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या संकुलात संवाद सत्रे आणि नुक्कड नाटक- म्हणजेच पथनाटकांच्या सादरीकरणाचे आयोजनही केले जाईल. 'थिएटर बाजार' हे या महोत्सवातले आणखी एक मुख्य आकर्षण असणार आहे. याअंतर्गत नव्याने लिहिलेल्या नाटकांना प्रोत्साहन दिले जाईल. यातील निवडक नाटकांना पुरस्कार देऊन ती प्रकाशित केली जाणार आहेत. 'श्रुती' या उपक्रमांतर्गत १७ पुस्तकांचे प्रकाशन केले जाईल. विशेष म्हणजे, महिलांनी दिग्दर्शित केलेल्या ३३ नाटकांचे सादरीकरण या महोत्सवात केले जाणार आहे. स्वातंर्त्यसैनिक, समाजसुधारक आणि नामवंत रंगभूमी तज्ज्ञांच्या सन्मानार्थ विशेष सादरीकरणे देखील होणार आहेत. या महोत्सवात भारताच्या विविध खाद्यपरंपरा आणि पारंपरिक हस्तकलांचे दर्शन घडवणारे विशेष स्टॉल्स असतील, यामुळे या म होत्सवानिमित्त मिळर्णाया सांस्कृतिक अनुभवात अधिकची भर पडणार आहे.

'भारत रंग महोत्सव २०२६' चे भव्य स्वरूप लक्षात घेता, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरा-वरील आघाडीच्या सांस्कृतिक तसेच शैक्षणिक संस्थांचे सहकार्य लाभले आहे. यामध्ये मैथिली-भोजपुरी अकादमी, हिंदी अकादमी, गढवाली-कुमाऊनी-जौनसारी अकादमी आणि उर्दू अकादमी (दिल्ली सरकार) यांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्यामध्ये नॅशनल पोलिश थिएटर अकादमी (वॉर्सा), नॅशनल अकादमी ऑफ थिएटर अँड फिल्म आर्ट्स (माद्रिद) आणि रशियन इन्स्टिट्यूट ऑफ थिएटर आर्ट्स – जीआयटीआयएस (मॉस्को) यांचा समावेश असून, भारताच्या विविध राज्यांचे आणि सांस्कृतिक संस्थांचेही या महोत्सवाला पाठबळ लाभले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# हजारो भाविकांच्या उपस्थितीत विठ्ठल रुक्मिणीचा शाही विवाह सोहळा संपन्न

## पंढरीत ठिकठिकाणी विवाह सोहळ्याकरिता लावल्या स्क्रीन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


पंढरपूर/प्रतिनिधी : वसंत पंचमीच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल रुक्मिणी चा शाही विवाह सोहळा मंदिरामध्ये संपन्न झाला विवाह सोहळ्यासाठी पंढरपूर शहर व हजारो भाविक उपस्थित होते. विवाह सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर विठ्ठल मंदिरामध्ये आकर्षक फुलाची सजावट करण्यात आलेली होती.

दुपारी बारा वाजता विठ्ठल रुक्मिणी चा शाही विवाह सोहळा संपन्न झाला. यावेळी मंदिर समितीचे सहा अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज व मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. जळगावकर महाराज हेही उपस्थित होते. बेंगलोर इथून आणलेल्या खास श्री विठ्ठल रुक्मिणी चा पोशाख परिधान करण्यात आला होता. सभामंडपामध्ये श्री विठ्ठल रुक्मिणी यांचा विवाह सोहळा हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी हजारो भाविकांना भोजनाची सोय करण्यात आलेली होती. भाविकांना विठ्ठल रुक्मिणीचा शाही विवाह सोहळा पाहता यावा म्हणून मंदिर परिसरात व शहरांमध्ये स्क्रीन लावल्या होत्या. व सायंकाळी सहा वाजता विठ्ठल रुक्मिणीचे शाही मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये हजारो भाविक सहभागी झाले होते. शाही विवाह सोहळा पार पाडल्यामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक पुलावाची सजावट करण्यात आलेली होती. यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, श्री संभाजी शिंदे, व सदस्य अँड माधवी निगडे, शकुंतला नडगिरी, यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या विवाह सोहळ्यानिमित्त आकर्षक फुलांची सजावट







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या विवाह सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेच्या गाभाऱ्यात, चौखांबी, श्री संत नामदेव पायरी, श्री विठ्ठल सभामंडप आदी प्रमुख ठिकाणी अत्यंत आकर्षक व देखणी फुलांची सजावट करण्यात आली आहे.

या सजावटीसाठी सुमारे चार ते साडेचार टन फुलांचा वापर करण्यात आला असून त्यामध्ये गुलाब, आस्टर, लाल व पिवळा झेंडू, जरबेरा, ऑर्किड, शेवंती, बिजली आदी विविध प्रकारच्या व रंगांच्या फुलांचा समावेश आहे. संपूर्ण सजावट अत्यंत कलात्मक पद्धतीने साकारण्यात आली असून यासाठी ५० ते ६० कुशल कारागिरांनी अथक परिश्रम घेतले आहेत.

सदरची फुलांची सजावट श्री विठ्ठल भक्त भारत दिलीप भुजबळ (पुणे) यांनी सेवाभावी वृत्तीने व पूर्णतः मोफत स्वरूपात करून दिली आहे. या आकर्षक फुलसजावटीमुळे मंदिर परिसर अधिकच मनोहारी व भक्तिमय झाल्याने भाविकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## माघ यात्रा; पंढरपूर शहर व वाखरीत मांस, मटण विक्रीस मनाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माघ शुध्द एकादशी २९ जानेवारी २०२६ रोजी असून, माघ यात्रा कालावधी दि. २३ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी आहे. या यात्रा कालावधीत शहरात श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. दिनांक २८ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत पंढरपूर शहरात तसेच वाखरी परिसरात दिनांक २७ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करणे यावर बंदी घालण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन उपविभागीय दंडाधिकारी श्री.इथापे यांनी पंढरपूर शहरातील तसेच वाखरी परिसरात मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करणे यावर बंदी घालण्यात आली आहे.

# नागपूर विभागात अर्जुनीमोरगावचे अबाकसमध्ये दोन विद्यार्थी चमकले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/बाराभाटी : दिनांक १८-०१-२०२६ हेडगेश्वर स्मारक समिती रेशिमबाग नागपुर येथे १४ वे राज्यस्तरीय णउचड रलरलीं स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धा मध्ये नागपुर विभागाचे जवड़पास १००० पेक्षा जास्त विद्यार्थीयानी सहभाग घेतला होता. यामधे अर्जुनी मोरगांव येथुन द्वारकाजित मंडले यांच्य णउचड अबाकस अर्जुनी मोरगांव सेंटर येथिल विद्यार्थी सहभाग होते. यामध्ये नक्श संचित वालव्हे हा विद्यार्थी १ कैटेगिरित लहराळिप रहीला व भाविक ज्ञानेश्वर लोहार हा उ कैटेगरीत चैंपियन तसेच ओम गणेश मुंडे १ रैंक,अन्वी इन्द्रनिल काशिवार ५ रैंक, पूर्वई बोलनकर २ रैंक, जय राज ब्राह्मणकर ४ रैंक या सगळ्या विद्यार्थ्यांनी आपआपल्या कैटेगरी मधे आपले नाव कोरले.

त्याचप्रमाणे आरोही नेताजी कापगते , माही देवेंद्र नाकाडे, स्वरा आनंदकुमार गुरनूले, श्रद्धा संदीप तुलवी, नील रवींद्र नाकाडे हे सर्व मेरिट आले. णउचड अबाकस ही रीळींहाशींळल लरश्रर्लीश्रींळेप पद्धत आहें. या लोशिंींळींळेप मधे ८ मिनिटात २०० प्रश्न सोडवायचे असते.

प्रावीण्य प्राप्त केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी आई वडील व केंद्रप्रमुख मंडले यांना यशाचे श्रेय दिले.




# निफाडला नगरपंचायतच्या वतीने प्लॅस्टिक बंदी मोहीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

निफाड नगरपंचायत, निफाडला सिंगल युज प्लास्टिक बंदी मोहीम राबविण्यात आली

सिंगल युज प्लास्टिक बंदीच्या अनुषंगाने केंद्रीय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचने नुसार निफाड नगरपंचायत च्या वतीने मुख्याधिकारी धिरज भामरे यांच्या आदेशान्वये आठवडे बाजारच्या दिवशी प्लास्टिक बंदी मोहीम राबविण्यात आली. मोठमोठे व्यापारी तथा भाजीपाला विक्रेते, फळविक्रेते, लहान मोठे विक्रेते यांच्याकडून प्लास्टिक जप्त करण्यात आले. यावेळी नगरपंचायत चे अधिकारी शरद बोडके, राहुल लामखेडे, विनोद त्रिभुवन कर्मचारी शरद काकुळते, दिपाली गिते, सिद्धार्थ जगताप, संकेत मोगरे इत्यादी अधिकारी कर्मचारी यांनी ही कारवाई केली.



# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या सॉफ्टबॉल संघाची आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत उपविजेतेपदाला गवसणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथील सॉफ्टबॉल मुलांच्या संघाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत आयोजित आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील गौरवशाली परंपरेला नवी उंची प्राप्त करून दिली आहे. संघाच्या या यशामुळे महाविद्यालयात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल खेळाडूंना प्रोत्साहन व शुभेच्छा देण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, अधिष्ठाता डॉ. बी. एस. बलवंत, डॉ. सुशीलकुमार शिंदे व डॉ. अमोल ममलया यांनी प्रत्यक्ष मैदानावर उपस्थित राहून खेळाडूंचे मनोबल वाढवले. त्यांनी संघाच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी महाविद्यालयातील उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक व सेवक वर्गाने विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. संघाने दाखवलेली सांघिक भावना, शिस्त व मेहनत ही इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे मत प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी व्यक्त केले.

# ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या सिंदखेडराजा तालुका संघटकपदी पत्रकार राहुल साबळे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सिंदखेडराजा तालुक्यातील ग्राहकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी ,कार्यरत असलेली भारत सरकार नोंदणीकृत भारत सरकार माणुसकी सोशल फाउंडेशन संचालित ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या सिंदखेडराजा तालुका संघटक पदी दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क चे बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी पत्रकार राहुल साबळे यांची नव्याने नियुक्ती झालेली आहे.

ही नियुक्ती ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष दादाभाऊ केदारे तसेच राष्ट्रीय सचिव अविनाश झोटिंग यांनी केली आहे. तसेच विदर्भाध्यक्ष सचिन खंडारे,विदर्भ कार्याध्यक्ष सुनील अंभोरे ,बुलढाणा जिल्हा अध्यक्ष डॉ.शालिग्राम चव्हाण,डॉ.गंगाराम उबाळे यांच्या मार्गदर्शनातून ही नियुक्ती झालेली आहे.

सिंदखेडराजा तालुका संघटक पदी दरेगाव येथील पत्रकार राहुल साबळे यांचा सामाजिक,शैक्षणिक,राजकीय तसेच विविध क्षेत्रात दांडगा अनुभव असून.सध्या ते पत्रकार म्हणून काम पाहत आहेत.त्यामुळे त्यांच्या या कामाचा नक्कीच जनतेच्या तसेच ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी फार मोठी मदत व फायदा होणार आहे. सिंदखेडराजा तालुक्यातील ग्राहकांना न्याय देण्याचे काम माझ्या हातून घडत आहे. व माझी निवड सिंदखेडराजा तालुका संघटक पदी केल्याबद्दल राष्ट्रीय अध्यक्ष दादाभाऊ केदारे तसेच राष्ट्रीय सचिव विदर्भ अध्यक्ष व बुलढाणा जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ पदाधिकारी यांचे आभार त्यांनी मानले आहे.चांगल्या प्रकारचे ग्राहकांच्या समस्येचे निवारण करण्यासाठी कटिबद्ध आहे ,अशी त्यांनी ग्वाही दिलेली आहे.

त्यांच्या या ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती सिंदखेडराजा तालुका संघटक पदीनिवडीमुळे जिल्ह्यासह, सिंदखेडराजा तालुक्यातुन तसेच सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

### निफाडला खंडेराव महाराज यात्रोत्सवाची बैठक

# यात्रा कमिटी अध्यक्षपदी अनिल पा. कुंदे, उपाध्यक्ष पदी संदीप गाजरे तर खजिनदार सुभाष कर्डीले यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

निफाड परिसराचे आराध्य दैवत श्री खंडेराव महाराज यात्रोउत्सव दिनांक १फेब्रुवारी २०२६रोजी होणार असून या निमित्त निफाड नगरपंचायत येथे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे व श्री खंडेराव भक्त शेलार बाबा यांचे प्रमुख उपस्थितीत नियोजन बैठक संपन्न झाली..

यावेळी यात्रा उत्सवानिमित्त विविध विषयांवर चर्चा करण्यात आल्या , यावर्षीच्या यात्रा कमिटी अध्यक्ष पदी अनिल पाटील कुंदे, उपाध्यक्षपदी संदीप गाजरे तर खजिनदार पदी सुभाष कर्डिले यांची निवड करण्यात आली आहे, तसेच २६ जानेवारी रोजी सकाळी ९/३० वाजता गाड्यांचा लिलाव होणार असून त्यांचे पूजन करण्यात येणार आहे, यात्रा उत्सव काळात विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे ,यावेळी ही सर्व जाती-धर्माचे बांधव. यात्रा उत्सवात सहभागी होणार आहेत,. प्रत्येकाने यात्रोत्सवात सहभागी होऊन यात्रा शांततेत, भक्तीभावाने साजरी करण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन यावेळी करण्यात आले याप्रसंगी ., नंदू भाऊ शेलार, सुभाष कर्डिले, देवदत्त कापसे, रमेश जेऊघाले, रमेश जाधव, नंदकुमार कापसे, डॉ.नितीन धारराव ,राजेंद्र महाराज थोरात ,सुभाष आढाव, मोहन जाधव ,विक्रम रंधवे, संजय धारराव, शंकर राजोळे, ज्ञानेश्वर पवार, प्रमोद गाजरे ,माधव धारराव, विष्णू शिरसाठ, किरण ढगे ,नामदेव जाधव, गणेश लोखंडे, योगेश कुंदे, धनंजय कापसे, सुभाष कापसे, गणेश धारराव ,सनी कुंदे, आदी ग्रामस्थ व खंडेराव फक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते

### शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप; आत्मदहनाचा इशारा, लोकप्रतिनिधींनाही सुनावणी

# महापारेषण विद्युत वाहिनीचा 'मनमानी कारभार'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : कल्याण तालुक्यातील कोसले परिसरामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित कडील उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीच्या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचा संताप उसळला आहे. जमिनीवर अतिक्रमण करताना योग्य मोबदला न देता, कोणतीही पूर्वसूचना न देता तसेच पोलिसांच्या धाकावर काम पुढे नेण्यात येत असल्याचा गंभीर आरोप बाधित शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे.

देशाचा आणि राज्याचा विकास शेतकऱ्यांना मान्य आहे; परंतु आमच्याच शेतीवर नांगर फिरवून आम्हाला भूमिहीन करण्याचा अधिकार कुणालाही नाही, असे शेतकऱ्यांचे स्पष्ट म्हणणे आहे. बांधीत झाडे, शेती आणि जमिनीची किंमत न देता काम सुरू केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये रोष आहे. विद्युत वाहिनीच्या अनेक तारा जमिनीवरून गेल्यानंतर त्या जमिनीची किंमत कोसळते, त्याचा थेट परिणाम शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या उपजीविकेवर होत असल्याचे शेतकऱ्यांनी निदर्शनास आणले.

शासन म्हणते शेतकरी लाखाचा पोशिंदा आहे; पण प्रत्यक्षात त्याची पिळवणूक सुरू आहे, असा आरोप शेतकरी करत असून न्याय न मिळाल्यास आत्महत्येची वेळ शेतकऱ्यावर येते, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या अतिउच्च दाब प्रकल्प विभाग, कल्याणमार्फत ४०० केव्ही बाभळेश्वर-कुडूस वाहिनीचे काम कोसले, काकडपाडा, पळसोली परिसरात सुरू आहे. बाधित शेतकऱ्यांनी योग्य मोबदला मिळाला नाही तर आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. याशिवाय स्थानिक लोकप्रतिनिधींनी या मुद्द्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अन्यथा आगामी निवडणुकीत त्याचे परिणाम भोगावे लागतील, असा थेट इशाराही देण्यात आला आहे.

आमची फसवणूक झाली असून दमदाटीने आमच्या जमिनीवर अधिकारी काम करत आहेत. पुढे मोबदला न देता काम सुरू ठेवले तर आम्ही आमरण उपोषण करू, असे सुनील दळवी (बाधित शेतकरी, कोसले) म्हणाले.

# सरसेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/ प्रतिनिधि सुधाकर रणदिवे, महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन च्या वतीने प्रत्येक वर्षी प्रमाणे याही वर्षी महानायक,आझाद हिंद सेनेचे संस्थापक नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती लातूर येथील कार्यालयात व बेघर निवारा केंद्रात फळे व खाऊचे वाटप करुन साजरी करण्यात आली.

याविषयी सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन महाराष्ट्र राज्य ही संघटना प्रत्येक वर्षी विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करते त्याच बरोबर नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती विविध उपक्रम राबवून साजरी करते. परंतु यावर्षी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक आदर्श आचारसंहितेचे पालन करीत ही जयंती राजकीय पुढाऱ्यांना टाळून साजरी करण्यात आली. यात संस्थेचे पदाधिकारी व सदस्यांचा तसेच सर्व सामान्य नागरिकांना सोबत घेऊन मुख्य कार्यालयात जयंती साजरी करण्यात आली. त्यानंतर लातूर येथील बेघर निवारा येथे या निवाऱ्यास वास्तव्यास असलेल्या नागरिकांना सत्कार करुन खाऊ व फळांचे वाटप करण्यात आले.यावेळी संस्थापक सचिव सुफी सय्यद शमशोद्दीन, प्रदेशाध्यक्ष अनिसखान पठाण, मराठवाडा अध्यक्षा उषाताई धावारे, प्रदेश संघटक सिद्धार्थ कवठेकर, प्रदेश संघटक सुरेखा घोडके, जिल्हा संघटक राणी माळी-लोढा, आकाश कांबळे जिल्हा संघटकशहर, वैशाली रोकडे,नईमभाई शेख, सय्यद मुजीब, मोहम्मद सिद्दीकी, सय्यद अजहर, फैज शेख, ईत्यादि पदाधिकारी व सदस्य तसेच बेघर मधील बंधू भगिनी उपस्थित होते.

# संविधान हा भारतीयांचा श्वास : तुषार पगारे

## कर्मवीर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयात भारतीय संविधान गौरव दिनानिमित व्याख्यान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी

भारताचे संविधान हा देशातील सर्वोच्च कायदा आहे. आपल्या देशाचा राज्यकारभार संविधानानुसार चालतो. भारताचा स्वातंत्र्यलढा आणि भारताचे संविधान हे आपल्या पूर्वसुरीने आपल्याला दिलेले फार मोठे संचित आहे. नागरिकांच्या हक्काचे संरक्षण केवळ संविधानामुळे होते. राष्ट्रीय एकात्मता, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सार्वभौमत्व, न्याय, लोकशाही मूल्य, मानवी हक्क या सर्वांचा समावेश संविधानात आहे. प्रत्येक भारतीयांचा संविधान हा श्वास आहे. घराघरात संविधानाचे वाचन होऊन संविधानाचा अर्थ समजून घेतला पाहिजे. असे मत संविधान व्याख्याते तुषार पगारे यांनी केले. मराठा विद्या प्रसारक समाजाचे कर्मवीर गणपत दादा मोरे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड येथे प्राचार्य डॉ. एस एन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला,

यावेळी व्यासपीठावर प्रा.डॉ. ज्ञानोबा ढगे, ज्युनियर कॉलेजचे उपप्रचार्य प्रा. अभय वडघूले, . राहुल सोनवणे, प्रा डॉ. लॉरेंनसीया जे. सुसान, प्रा. सविता कापसे आदि उपस्थित होते.

तुषार पगारे पुढे म्हणाले की, प्रत्येक . विद्यार्थ्यांनी जर संविधान समजून घेतले तर त्यांच्या सर्वांगीण विकासाला अधिक चालना मिळून विद्यार्थी योग्य रीतीने आपली शैक्षणिक वाटचाल पूर्ण करू शकतात. त्यातून भारत देशाला भविष्यात अधिक सक्षम नागरिक मिळू शकतात. यासाठी माध्यमिक व महाविद्यालयीन जीवनातच तरुणांना संविधानाचे बाळकडू मिळून जनजागृती होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. प्रा डॉ. ज्ञानोबा ढगे म्हणाले की, शासनाचे धोरण आणि योजना या संविधानावरच आधारित असतात. भारतीय संविधानात नागरिकविषयक तरतूद, सरकारने करावयाची कामे, विधिमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ, नागरिकांचे मूलभूत अधिकार, राज्याना मार्गदर्शक तत्वे, त्यांची कर्तव्य, ,स्थानिक स्वराज्य संस्था,लोकप्रतिनिधी, प्रशासन, आदी बाबत सविस्तर तरतुदी केलेल्या आहेत. भारतीय संविधानानुसार प्रत्येकाने वर्तन केले पाहिजे असे मत व्यक्त केले.

सर्वप्रथम मान्यवरांनी भारतीय संविधान आणि महापुरुषांच्या प्रतिमेला अभिवादन केले. संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.प्रतिभा वाटपाडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.जयश्री जगताप यांनी करून दिला. प्रा. रोहिणी सुरवाडे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रा. वैशाली धूम यांनी मानले

# रुग्णांच्या सोयी-सुविधांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा : मंगल प्रभात लोढा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई उपनगर जिल्ह्याचे सहपालकमंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत सेठ गोर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयाचा १०० वा वर्धापनदिन साजरा

'रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणाली' रुग्णालयात संपूर्ण क्षमतेने वापरात येणार



मुंबई : सेठ गोर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व राजे एडवर्ड स्मारक (के. ई. एम.) रुग्णालयात येणाऱ्या नागरिकांच्या सुविधेसाठी अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देतानाच कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञानस्नेही सुविधा उपलब्ध करून देण्यासह केंद्र, राज्य सरकारच्या आरोग्य योजनांची माहिती नागरिकांना देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे सहपालकमंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांनी दिले. सेठ गोर्धनदास सुंदरदास महाविद्यालय व राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयाच्या शतक महोत्सवी समारंभात आज (दिनांक २२ जानेवारी २०२६) श्री. लोढा उपस्थितांशी संवाद साधताना बोलत होते.

यावेळी आमदार श्री. कालिदास कोळंबकर, उपआयुक्त (सार्वजनिक आरोग्य) श्री. शरद उघडे, संचालक (वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये) डॉ. शैलेश मोहिते, अधिष्ठाता (केईएम रुग्णालय) डॉ. (श्रीमती) संगीता रावत आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रातील देशभरातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभावे, या अनुषंगाने संवाद केंद्र (कम्युनिकेशन सेंटर) उभारण्यात यावे. या केंद्रामुळे विद्यार्थ्यांना देशभरातील तज्ज्ञ व्यक्तींशी जोडले जाणे शक्य होईल. वैद्यकीय क्षेत्रात मोठी स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे केंद्र मार्गदर्शक ठरावे, असेही श्री. लोढा यावेळी म्हणाले.

नागरी सुविधा केंद्राच्या माध्यमातून रुग्ण तसेच रुग्णांच्या नातेवाईकांना वैद्यकीय उपचाराची माहिती, आसन व्यवस्था अशा सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. कृत्रिम बुध्दिमत्तेचा (ींळषळलळरश्र खपींशश्रश्रळ-सशपलश) वापर करून केंद्र आणि राज्य सरकारच्या आरोग्य क्षेत्रातील योजनांची माहिती रुग्णांना उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्यासाठी महाविद्यालयाच्या एका चमूने ही प्रणाली विकसित करण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच, वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी, डॉक्टर यांच्यासाठी व्यक्तिमत्व विकास, मैदानी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे, अशी सूचनाही श्री. लोढा यांनी याप्रसंगी केली.

आरोग्य सेवा गुणवत्तापूर्ण आणि कार्यक्षमपणे उपलब्ध करून देतानाच डिजिटल तंत्रज्ञाचाही वापर केईएम रुग्णालयात प्रभावीपणे करण्यात आला आहे. 'रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणाली' (हॉस्पिटल मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टिम) (क्चखड) या सुविधेचा अतिशय प्रभावीपणे वापर करण्यासाठी केईएम रुग्णालय सज्ज झाले आहे. लवकरच संपूर्ण क्षमतेने या प्रणालीचा वापर रुग्णालयात सुरु होईल, अशी माहिती उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) श्री. शरद उघडे यांनी कार्यक्रमादरम्यान दिली.

रुग्णालयातील रुग्णशय्या क्षमता ही २ हजार असून येथे प्रतिदिन ६ हजार बाह्यरुग्ण हाताळण्याची क्षमता आहे. के. ई. एम. रुग्णालयातील डॉक्टर्स, परिचारिका, चतुर्थ श्रेणी कर्मचारी या सगळ्यांचे योगदान यामध्ये आहे. रुग्णांच्या सुविधेसाठी येत्या काळात 'सर्व्हीस टॉवर' निर्माण करण्यात येत आहे. या टॉवरच्या माध्यमातून रुग्णांना विविध चाचण्यांची सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करुन देण्याचा रुग्णालय प्रशासनाचा मानस असल्याची माहिती के. ई. एम. रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत यांनी दिली. वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १२०० विद्यार्थी क्षमता असलेल्या वसतिगृहाची सुविधा लवकरच उपलब्ध होत आहे, अशी माहिती देखील त्यांनी यावेळी दिली.

# सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट 'द एलिशियन फील्ड' तर 'बाप्या'ला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा(पिफ)त आज सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपटाचा पुरस्कार 'द एलिशियन फील्ड' या चित्रपटाला, तर सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट पुरस्कार 'बाप्या' या चित्रपटाला महाराष्ट्र चित्रपट आणि सांस्कृतिक रंगभूमी विकास प्राधिकरणाचे सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजनीकर आणि आंतरराष्ट्रीय ज्यूरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.पुणे फिल्म फाउंडेशन, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व दादासाहेब फाळके चित्रनगरी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने २४ वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (पिफ) २०२६ यंदा १५ ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत घेण्यात आला. आज संध्याकाळी बालगंधर्व रंगमंदिर येथे झालेल्या भव्य सोहळ्यात पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, 'पिफ'चे यावर्षीचे आंतरराष्ट्रीय ज्युरी बी. जयमोहन (भारत), पिटर केरेकेस (स्लोव्हाकिया), रीट्टा आल्टो(फिनलँड), सिनू रामासामी (भारत), सेर्गी कासामीतजाना(स्पेन), येसिम उस्ताओग्लू (तुर्कस्थान), विविध देशांचे कॉन्सूल जनरल, टाटा मोटर्सचे व्यवस्थापक आनंद आगाशे, पुणे फिल्म फाउंडेशनचे विश्वस्त, 'पिफ'चे उपसंचालक विशाल शिंदे, आदिती अक्कलकोटकर उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाचा ''प्रभात'' सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, १० लाख रुपये रोख रकमसह, प्रदीप कुरबाह दिग्दर्शित आणि मोर्जिना कुरबाह, अर्पणा कुरबाह व जोवा कुरबाह निर्मित 'द एलिशियन फील्ड' या चित्रपटाला प्रदान करण्यात आला. यापैकी ५ लाख रुपये दिग्दर्शकांना आणि ५ लाख रुपये निमत्यांमध्ये समान वाटले जाणार आहेत. महाराष्ट्र शासनाचा ''प्रभात'' सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट दिग्दर्शक पुरस्कार, ५ लाख रुपये रोख रकमसह, 'अॅडम्स सेक' या चित्रपटासाठी लॉरा वँडेल यांना प्रदान करण्यात आला. यावेळी उल्लेखनीय चित्रपट म्हणून 'लॉस्ट लँड' या चित्रपटाच्या निर्माते स्टेफान ल्होएस्ट, डेल्फिन टॉमसन, मेरी-अँज लुसियानी यांना ज्यूरी विशेष उल्लेख प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी मराठी चित्रपट स्पर्धेचे पुरस्कार वितरण करण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षण आंतरराष्ट्रीय ज्यूरींमार्फत करण्यात येते.

महाराष्ट्र शासनाचा ५ लाख रुपये रोख रकमेचा 'संत तुकाराम' सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट पुरस्कार समीर तिवारी दिग्दर्शित आणि समीर तिवारी व मुक्तल तेलंग निर्मित 'बाप्या' या चित्रपटाला प्रदान करण्यात आला.

'पिफ' सर्वोत्कृष्ट चित्रपट दिग्दर्शक पुरस्कार, २५,हजार रुपये रोख रकमेसह, 'गोंधळ' चित्रपटाचे दिग्दर्शक संतोष डावखर यांना प्रदान करण्यात आला.

'पिफ' सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार, २५,हजार रुपये रोख रकमेसह, 'बाप्या' चित्रपटातील अभिनयासाठी गिरीश कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला.

'पिफ' सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार, २५,हजार रुपये रोख रकमेसह, 'बाप्या' चित्रपटातील अभिनयासाठी राजश्री देशपांडे यांना प्रदान करण्यात आला.

'पिफ' सर्वोत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार, २५,हजार रुपये रोख रकमसह, 'गोंधळ' चित्रपटासाठी अमलेंदू चौधरी यांना प्रदान करण्यात आला.

'पिफ' सर्वोत्कृष्ट पटकथा पुरस्कार, २५,हजार रुपये रोख रकमेसह, 'तो ती आणि फुजी' चित्रपटासाठी इरावती कर्णिक यांना प्रदान करण्यात आला. 'जीव' चित्रपटाचे दिग्दर्शक रवींद्र माणिक जाधव यांना ज्युरी विशेष उल्लेख प्रमाणपत्र देण्यात आले. 'तो ती आणि फुजी' चित्रपटातील अभिनयासाठी ललित प्रभाकर यांना ज्युरी विशेष उल्लेख प्रमाणपत्र देण्यात आले. शुभम सुमित या 'एफटीआयआय'च्या विद्यार्थ्याला 'पिफ'चा विशेष पुरस्कार देण्यात आला.

# भारत निवडणूक आयोगाच्या 'ईसीआयनेट' डिजिटल प्लॅटफॉर्मचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारत निवडणूक आयोगाने इंडिया इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन डेमोक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट (आयआयसीडीईएम)-२०२६ दरम्यान 'ईसीआयनेट (ईसीआयएनईटी)' या एकात्मिक डिजिटल प्लॅटफॉर्मचे उद्घाटन केले. २१ ते २३ जानेवारी २०२६ दरम्यान भारत मंडपम, नवी दिल्ली येथे ही तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या संकल्पनेतून, तसेच निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्या सहकार्याने 'ईसीआयनेट'ची निर्मिती करण्यात आली असून, त्याची विकासाची घोषणा मे २०२५ मध्ये करण्यात आली होती.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितले की, हा प्लॅटफॉर्म कायद्याच्या चौकटीत विकसित करण्यात आला असून तो २२ अनुसूचित भाषा आणि इंग्रजीत उपलब्ध आहे. जगभरातील निवडणूक व्यवस्थापन संस्थांनी त्यांच्या देशांतर्गत कायदे व स्थानिक भाषांनुसार अशाच डिजिटल प्लॅटफॉर्मच्या विकासासाठी भारतासोबत सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू यांनी ईसीआयनेटमुळे निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता वाढून निवडणूक संस्थांवरील विश्वास दृढ होईल, तसेच कार्यपद्धतीवर प्रभावी देखरेख, जलद निर्णयप्रक्रिया आणि माहितीचा वेगवान प्रसार शक्य होईल, असे नमूद केले. तर डॉ. विवेक जोशी यांनी या परिषदेमुळे तंत्रज्ञान आणि डिजिटल नवकल्पनांच्या वापराबाबत जागतिक सर्वोत्तम पद्धती जाणून घेण्याची संधी निवडणूक संस्थांना मिळणार असल्याचे सांगितले.

माहिती तंत्रज्ञान विभागाच्या महासंचालक डॉ.सीमा खन्ना यांनी सादरीकरणात सायबर सुरक्षेला ईसीआयनेट मुख्य आधारस्तंभ असल्याचे स्पष्ट केले. आज तंत्रज्ञान केवळ सहाय्यक भूमिका बजावत नसून, ते धोरणात्मक सक्षमक बनले असल्याचे त्यांनी सांगितले. 'ईसीआयनेट'मुळे निवडणुकांमध्ये पारदर्शकता, कार्यक्षमता, विश्वासार्हता आणि जनतेचा विश्वास वाढेल, असेही त्यांनी नमूद केले.

ईसीआयनेट हा जगातील सर्वात मोठा निवडणूक सेवा प्लॅटफॉर्म असून, भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीतील निवडणूक आयोगाच्या ४० हून अधिक ॲप्स आणि पोर्टल्सचे एकत्रीकरण यात करण्यात आले आहे. भारतीय संविधान, लोकप्रतिनिधी अधिनियम १९५० व १९५१, मतदार नोंदणी नियम १९६० आणि निवडणूक आचार नियम १९६१ यांच्याशी पूर्ण सुसंगततेने हा प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आला आहे.

या प्लॅटफॉर्मद्वारे नागरिक, उमेदवार, राजकीय पक्ष आणि निवडणूक अधिकारी एकाच सुरक्षित प्रणालीवर जोडले गेले आहेत. मतदार नोंदणी, मतदार यादी शोध, अर्जाची स्थिती तपासणे, उमेदवारांची माहिती, निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क, बीएलओसोबत कॉल बुकिंग, ई-ईपीआयसी डाउनलोड, मतदान प्रवृत्ती आणि तक्रार निवारण अशा अनेक सेवा येथे उपलब्ध आहेत.

ईसीआयनेटची बीटा आवृत्ती २०२५ बिहार विधानसभा निवडणुका आणि विशेष सघन पुनरिक्षण (एसआयआर) दरम्यान यशस्वीपणे वापरण्यात आली. यामध्ये नागरिकांच्या सूचनांचा विचार करून अंतिम स्वरूप देण्यात आले. आतापर्यंत या प्लॅटफॉर्मवरून १० कोटींहून अधिक नोंदणी अर्जावर प्रक्रिया झाली असून, दररोज सरासरी २.७ लाख अर्ज हाताळले जात आहेत. ११ लाखांहून अधिक बूथ लेव्हल ऑफिसर्स (बीएलओ) नोंदणीकृत असून, १५० कोटींहून अधिक दस्तऐवजांचे डिजिटायझेशन करण्यात आले आहे. तसेच, क्षेत्रीय पातळीवरील कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर प्रभावी देखरेख करण्याची सुविधाही या प्रणालीत उपलब्ध आहे, असे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धापत्रकाद्वारे कळविले आहे.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास एक लाख रुपयांची देणगी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या पवित्र विवाह सोहळ्यानिमित्त पंढरपूर येथे मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते. या भाविकांसाठी भोजन व्यवस्थेच्या दृष्टीने पुणे येथील श्री प्रकाश नारायण कोरडे व सौ. राणी प्रकाश कोरडे यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीस एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

सदर देणगी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या विवाह सोहळ्याच्या काळात येणाऱ्या भाविकांना भोजन व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी उपयोगात आणण्यात येणार आहे. या प्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समिती सदस्या ॲड. माधवीताई निगडे यांच्या हस्ते देणगीदारांचा श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची मूर्ती व उपरणे देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

### महसूल व ग्रामविकास विभागाने दिली मान्यता

# ३९ भूमिहीन घरकुल लाभार्थ्यांना मिळणार हक्काचे घरकुल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी




पंचायत समिती सिंदखेडराजा मार्फत घरकुल योजनेमध्ये भूमिहीन लाभार्थ्यांना हक्काचे घरकुल मंजूर करण्याची प्रक्रिया पार पडली. यासाठी शक्ती प्रदत्त समितीची बैठक आज पार पडली. या बैठकीमध्ये ग्रामपंचायत मधील भूमिहीन लाभार्थ्यांना गावठाणामधील जमिनीवर घरकुलासाठी मंजुरी देण्यात आली. प्राप्त अर्जांपैकी छाननी करून साखरखेर्डा येथील ३७ व पिंपळखुटा येथील २ अशा एकूण ३९ पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. तालुक्यातील ३९ कुटुंबांना हक्काची जागा व हक्काचे घरकूल या माध्यमातून मिळणार आहे. या शक्ती प्रदत्त समितीमध्ये अध्यक्ष म्हणून उपविभागीय अधिकारी संजय खडसे, सचिव म्हणून गटविकास अधिकारी अजित बांगर व सदस्य म्हणून तहसीलदार अजित दिवटे यांनी भूमिका पार पाडली.

बैठकीसाठी नायब तहसीलदार प्रवीण वराडे, विस्तार अधिकारी भास्कर घुगे, राजेश्वर पवार,अमृता शिंदे, ग्राम पंचायत अधिकारी चनखोरे, ग्राम महसूल अधिकारी पोंदे इत्यादी उपस्थित होते.

भूमिहीन लाभार्थ्यांना हक्काची जागा मिळून त्यांच्या पिढ्यांचा संघर्ष संपणार आहे. ३९ कुटुंबांना हक्काची जागा व घरकुल मिळणार आहे उपविभागीय अधिकारी संजय खडसे

३९ कुटुंबांना घरकुलाच्या माध्यमातून कायमचा हक्काचा निवारा मिळणार आहे. त्यांना घरकुल मिळत आहे याचा आनंद आहे, असे गटविकास अधिकारी अजित बांगर यांनी सांगितले.